# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**

एम.एस.सी., पी.एच.डी.

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ

संदर्भ क्र.: विकमं/२०१२–१३/९८१ दिनांक : ०५/०६/२०१३.

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व

महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

**विषय :–** **महाराष्ट्रातील विद्यापीठे, महाविद्यालये आणि शाळामध्ये वृक्षारोपण करण्यास परवानगी मिळणेबाबत.....**

**संदर्भ क्र. :–** **१. उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण २०१३/प्र.क्र. १५३/विशि–३, दि. २६ मार्च, २०१३ चे पत्र.**

**२. अमवि/२०१३/पवि/मवि–२/३०८२४/२८०६, दि. २८ मे २०१३ चे पत्र**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई–३२ व महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे ४११००१ यांचेकडील महाराष्ट्रातील विद्यापीठे, महाविद्यालये आणि शाळांमध्ये वृक्षारोपण करणेबाबतचे पत्र पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

याबाबतची माहिती घेऊन आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत/विभागात याबाबतची आपण आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

सदर कार्यवाहीचा अहवाल कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई–३२ व प्र. शिक्षण संचालक, (उच्चशिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१ यांना कळविण्यात यावा, ही विनंती.

कळावे,

**सोबत : वरीलप्रमाणे.**

(डॉ. पंडित एन्. शेळके)
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

**विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेश खिंड, पुणे – ४११ ००७.**

**☎ ०२० – २५६०११५४ फॅक्स : ०२० – २५६०११५४ मोबाईल : ९८५०१७६५७५**

UNIVERSITY OF PUNE (General Section) Inward No. 619

विद्यार्थी कल्याण मंडळ आवक/जावक क्र.:- 2923 दिनांक :- 5/6/2013 शाखा :- G.W.


# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय( उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१

Web:www.dhepune.gov.in email-dhepune@yahoo.co.in

फोन नं ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३


क्रमांक-अमवि/२०१३/पवि/मवि-२/३०८२४ /1208 दि. 28 MAY 2013

मा. कुलसचिव कार्यालय पुणे विद्यापीठ, पुणे-७. आवक क्र.-आर/ दिनांक - 1726 जावक दिनांक - 03/06/13 विभाग - 04/06/13 D.S.W.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय - महाराष्ट्रातील विद्यापीठे, कॉलेजेस आणि शाळामध्ये वृक्षारोपण करण्यास परवानगी मिळविण्याबाबत.**

**संदर्भ - शासनपत्र क्र. संकीर्ण २०१३/प्र.क्र.१५३/विशि-३, दिनांक २६/३/२०१३.**

उपरोक्त संदर्भांकित विषयी शासनपत्र सहपत्रांसह अवलोकन करावे. सदर शासनपत्रान्वये शासनाने कळविले आहे की, सदर शासन पत्रामध्ये श्री. महेंद्र घागरे, हरित मित्र परिवार संघटक यांनी मा. राज्यपाल यांना सादर केलेल्या व उच्च व तंत्र शिक्षण विभागास प्राप्त झालेल्या निवेदनाची प्रत सोबत जोडली आहे. सदर निवेदना संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी व संबंधीतांना परस्पर कळविण्यात यावे. असे कळविले आहे.

सदर बाबत श्री. महेंद्र घागरे, हरित मित्र परिवार यांना महाराष्ट्रातील विद्यापीठे, कॉलेजेस आणि शाळा यांमध्ये श्रमदानातुन वृक्षारोपनाचा कार्यक्रम विनामोबदला आणि स्वेच्छेने करण्यास तयार आहेत. तसेच रोपवाटिका तयार करण्याबाबतही मार्गदर्शन करतात.

तरी , सदर बाबत आवश्यकतेनुसार श्री. महेंद्र घागरे यांचेशी संपर्क साधावा. त्यांचा पत्ता श्री. महेंद्र घागरे, हरितमित्र परिवार, १०५/३०, घारगे रेसिडेंसी, २ रा मजला, कासट साडी शोरूमच्या मागे, कर्वे रोड शेजारी, पुणे-०४, असा आहे.

तरी, पावसाळा सुरू होत आहे. वृक्षारोपन कोणत्या प्रकारच्या झाडांचे करावे. वृक्षसंवर्धन कसे होईल. वृक्षसंवर्धन करणेसाठी कोणती तयारी करावी. श्री. महेंद्र घागरे सामाजीक बांधीलकी म्हणुन, पर्यावरण रक्षणासाठी सहकार्य करणेस तयार आहेत. त्यांचा मोबाईल क्रमांक ९४२०६६६८८८ आणि ९७६६०००८८८ आहे. तरी, त्यांच्याशी संपर्क साधावा व वृक्षारोपनाचा उपक्रम राबवावा.

संचालक, विद्यार्थी कल्याण
4.6.2013

28/5/2013
(डॉ. प्र. रा. गायकवाड)
प्र. शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्रराज्य पुणे १

प्रत-१. श्री. प्र.गि.कानडे ,कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना पत्र क्र. संकीर्ण २०१३/प्र.क्र.१५३/विशि-३, दिनांक २६/३/२०१३ च्या संदर्भात माहितीसाठी सविनय सादर.
२. श्री. महेंद्र घागरे, हरितमित्र परिवार, १०५/३०, घारगे रेसिडेंसी, २ रा मजला, कासट साडी शोरूमच्या मागे, कर्वे रोड शेजरी, पुणे-०४. यांना माहितीस्तव अग्रेषित.

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
30 MAR 2013
आवक क्रमांक:-
शाखा:-

क्र.संकीर्ण२०१३/प्र.क्र.१५३ /विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक – २६ मार्च ,२०१३.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,

विषय – महाराष्ट्रातील विद्यापीठे, कॉलेजेस आणि शाळामध्ये वृक्षारोपण करण्यास परवानगी मिळविण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात श्री. महेंद्र घागरे, हरित मित्र परिवार संघटक यांनी मा.राज्यपाल यांना सादर केलेल्या व उच्च व तंत्र शिक्षण विभागास प्राप्त झालेल्या निवेदनाची प्रत सोबत जोडली आहे. सदर निवेदना संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी व संबंधीतांना परस्पर कळविण्यात यावे ही विनंती.

आपला विश्वासू,

( प्र. गि. कानडे )
कक्ष अधिकारी

प्रत,
१) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.
२) श्री. महेंद्र घागरे, हरितमित्र परिवार, १०५/३०, घारगे रेसिडेंसी, २ रा मजला, कासट साडी शोरुम यांना माहितीस्तव अग्रेषित.

3/4/13

प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे,मध्यवर्ती इमारत,पुणे ४११ ००१.
दूरध्वनी क्रमांक : २६१२६३२४ फॅक्स : २६०५५२३०
Principal Chief Conservator of Forests & Director General,
Social Forestry, Maharashtra State, Pune
Central Building, Pune - ४११००१ Phone - ०२०-२६१२६३२४, Fax-२६०५५२३०
E-Mail - dirsfdpune@gmail.com

विषय- मोफत बि बियाणांचा पुरवठा करणे बाबत.
क्रमांक कक्ष-९/रा.ह.से/प्र.क्र. ५ / २३६ /२०१२.१३.
पुणे ४११ ००१. दिनांक १३ / १२ /२०१२.
१४

प्रति,

मुख्य वनसंरक्षक व उपमहासंचालक,
सामाजिक वनीकरण,
पुणे/नाशिक/नागपूर/ठाणे/औरंगाबाद/अमरावती.

संदर्भ- श्री. महेंद्र घागरे,संघटक,हरित मित्र परिवार,पुणे यांचेकडील पत्र दि.१३/१२/२०१२.

श्री. महेंद्र घागरे,संघटक,हरित मित्र परिवार,पुणे यांनी त्याचेकडील संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास असे कळविले आहे की, गेल्या २२ वर्षापासून त्यांचा जंगली बी-बीयांणाचा व्यवसाय असून समाजसेवा म्हणून ते गरजूना बि-बियाणे मोफत वाटतात, तसेच रोपवाटिका तयार करण्याबाबतही मार्गदर्शन करतात. आंता त्यांचा महाराष्ट्र राज्यातील ९००० राष्ट्रीय हरित सेनेच्या शाळांना मोफत बियाणे वाटण्याचा व त्याबाबत मार्गदर्शन करण्याचा मनोदय असल्याचे त्यांनी संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. संदर्भित पत्राची प्रत सोबत माहितीस्तव जोडली आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, कृपया सर्व उपसंचालकांनी सदर बाब सर्व शाळा व विद्यालयाच्या निदर्शनास आणावी तसेच त्यांच्या आवाहनास स्थानिक वृत्तपत्रांमध्ये व अन्य प्रसिध्दी माध्यमाद्वारे विस्तृत प्रसिध्दी देऊन जास्तीत जास्त शाळांनी त्याचा लाभ घेण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत आपले अधिनस्त उपसंचालकांना सूचना दयाव्यात.

सहपत्र-वरील प्रमाणे. मान्य-मसुदा

केंद्रस्थ अधिकारी,
राष्ट्रीय हरित सेना, महाराष्ट्र
तथा
अपर महासंचालक (संनियंत्रण व मुल्यांकन),
सामाजिक वनीकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रतिलिपी- श्री. महेंद्र घागरे,संघटक,हरित मित्र परिवार,पुणे यांचेकडे माहितीसाठी.

ndra Ghagare
aniser-Harit Mitra Pariwar
net Member-Solapur Vidyapeeth

obile : 9420666888
9766000888

Harit Mitra Pariwar
105/30, Ghagare Residency, 2nd Lane, Behind Kasat Sadi Showroom,
Off. Karve Road, Pune - 411004. E-mail : haritmitr@gmail.com

USG

मा. राज्यपाल सो.
महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई

दि. ०१-०२-२०१३

1316

महोदय,

हरितमित्र परिवार वृक्षरोपण व संवर्धनात गेली पंधरा वर्ष सातत्यपुर्ण सातत्याने काम करणारी संघटना आहे. या संघटनेचे संघटक खाली सही करणार महेंद्र घागरे हे सोलापूर विद्यापीठ येथे सिनेट सदस्य असून कोल्हापूर विद्यापीठात सल्लागार(वृक्षरोपण) म्हणून कार्यरत आहेत.

सोलापूर विद्यापीठात वनशेती १०० एकरात यशस्वी झालेली आहे. सदर प्रकरणासाठी शासनाचा व विद्यापीठाला कुठल्याही प्रकारची तोशीष लागलेली नाही. विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून हा प्रकल्प यशस्वीपणे राबविला गेला आहे.

अश्याप्रकारचे उपक्रम महाराष्ट्रातील विद्यापीठे, कॉलेजेस् आणि शाळा यांमध्ये राबविण्याची हरितमित्राची इच्छा असून आपण सदर उपक्रमात मान्यता देऊन, त्याचप्रमाणे जिल्हा अधिकारी यांना योग्य त्या सूचना वजा आदेश देऊन सदर उपक्रमासाठी माझी नेमणूक झाल्याचे कळविल्यास मी सदर काम स्वेच्छेने आणि विनामोबदला करण्यास तयार आहे.

कृपया आपली लेखी अनुमती कळवावी ही नम्र विनंती.

कळावे.

1346
4/2/13

Forest

आपला,

महेंद्र घागरे
हरितमित्र परिवार संघटक